BAPU TRUST FOR RESEARCH
ON MIND & DISCOURSE

“शोध - सायकीयाट्री पलीकडील वाटांचा…” हे पुस्तक आपल्या हाती देताना बापू ट्रस्टला अतिशय आनंद होत आहे. समाजामध्ये शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्याविषयी फार जाण आणि जाणीव नसली तरी जागरूकता हळूहळू वाढत चालली आहे. मन व शरीर हे वेगळे नसून एकरूप असे अस्तित्व आहे. हे पुस्तक मानसिक आरोग्य व कल्याणाविषयी आहे.

हे पुस्तक अनुवादित असले तरी यामध्ये काही भारतीयांनी अनुभव नव्याने लिहिले आहेत. मानसिक संकटातून बरे होण्यासाठी अनेक मार्ग यामध्ये सापडतील. या पुस्तकातील पर्याय हे खऱ्या लोकांचे व वास्तव पर्याय आणि स्वत:ला बरे करण्यासाठी शोधलेले वैयक्तिक व समुदायआधारित प्रयत्न आहेत. यात अनेक परदेशी निष्ठावान लोकांचे अनुभव आहेत. त्यांनी सायकियाट्रीक उपचार घेताना जो संघर्ष केला आहे, ज्या संकटातून ते गेलेले आहेत तशी परिस्थिती आज भारतातदेखील अगदी सामान्यपणे दिसते आहे. या सायकियाट्रीक उपचारांचे काही गंभीर दुष्परिणाम आहेत. त्यामुळे अनेक जणांना यातून सुरक्षितपणे माघार कशी घ्यावी हे समजत नाही. याचे पर्याय या पुस्तकात मिळतील. खरेतर हे केवळ पर्याय नसून एक सुरक्षित जीवनशैली आहे.

हे पुस्तक अनेक तरुणांना, सायकियाट्रीक उपचार घेणाऱ्यांना जे व्यक्तिगत, आध्यात्मिक, मानसिक संकटातून जात आहेत आणि समग्र जीवनाचे पर्याय शोधत आहेत अशा सर्वांसाठी उपयुक्त आहे!




इंग्रेज़ी संपादक : पीटर स्टंस्ने , पीटर  लेहमन, भार्गवी दावर
मराठी अनुवाद : सुजाता बाबर
मराठी संपादन: वन्दना अत्रे

अनुकूलन और अनुवाद अनुरोध के लिए:
बापू ट्रस्ट फॉर रिसर्च ऑन माइंड एंड डिस्कोर्स,
पुणे, भारत
ईमेल: bt.publishing@gmail.com
फ़ोन: 020-26441989

ISBN no.: 978-81-941730-5-2 (2019)
मूल्य: INR 250